जनमानसाचा निडर आवाज...

पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष ४ | अंक ९० | शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | www.puneprimenews.com | RNI NO - MAHMAR/2022/84210

संक्षिप्त

वाघोलीत रुग्णालयाबाहेर दोघांना मारहाण

वाघोली, ता. २९ : लाईफलाईन हॉस्पिटल येथे झालेल्या शाब्दिक वादातून दोघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सुमित हिवाळे यांनी वाघोली पोलिसांकडे तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ ऑक्टोबर रोजी औषधोपचाराचा खर्च देण्यासाठी सुमित हिवाळे व केशवभाऊ राखपसरे हे रुग्णालयात गेले होते. त्यावेळी दुचाकीस्वार गणेश देसाई व ऋषिकेश गुणावरे यांच्याशी वाद झाला. त्यानंतर रुग्णालयातील मित्र व नातेवाईकांसह पाच ते सहा जणांनी दोघांना मारहाण करून धमकी दिल्याचा आरोप आहे. या झटापटीत हिवाळे यांचे चांदीचे ब्रेसलेट हरवल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. पुढे राखपसरे यांनाही सोमेश्वर वडापावजवळ मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी वाघोली ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ - ११५(२),१८९ (२),१९१(२),३२४(४),३५१ (२),३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

राज्यातील २० जिल्हा परिषद, २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा?

आरक्षणाच्या पेचामुळे रखडलेल्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमाकडे लक्ष

अश्लेषा मस्के

पुणे, ता. २९ : महाराष्ट्रात पुन्हा एकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू होण्याची शक्यता आहे. राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांमुळे राजकीय हालचालींना वेग येण्याची अपेक्षा आहे. राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. आता या निवडणुकांचा अधिकृत कार्यक्रम कधी जाहीर होणार, याकडे राजकीय पक्ष, इच्छुक उमेदवार आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रात एकूण ३४ जिल्हा परिषदा आहेत. त्यापैकी १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये पार पडल्या होत्या. मात्र, उर्वरित जिल्ह्यांमध्ये आरक्षणासंबंधीच्या कायदेशीर अडचणींमुळे निवडणूक प्रक्रिया रखडली होती. काही ठिकाणी इतर मागासवर्गीयांसाठीच्या (ओबीसी) आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे गेल्याने हा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे संबंधित जिल्ह्यांतील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर या निवडणुकांबाबत पुढील प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. जुन्या ओबीसी आरक्षण पद्धतीनुसार निवडणुका घेण्याच्या मुद्द्यामुळे या प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या तारखा, उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आणि मतदानाचे वेळापत्रक राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत घोषणेनंतरच स्पष्ट होणार आहे.

निवडणुकीची प्रतीक्षा असलेल्या जिल्ह्यांमध्ये पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, बीड, जालना, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये जिल्हा परिषद निवडणुका झाल्यानंतर स्थानिक राजकारणात बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इच्छुक उमेदवारांकडूनही निवडणुकीच्या तयारीला सुरुवात होऊ शकते.

जिल्हा परिषदांबरोबरच पंचायत समित्यांच्या निवडणुकांचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. राज्यात एकूण ३५१ पंचायत समित्या आहेत. त्यापैकी १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये झाल्या होत्या. उर्वरित २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका आरक्षणासंबंधीच्या अडचणींमुळे रखडल्या होत्या. त्यामुळे आता या पंचायत समित्यांमध्येही निवडणुका कधी होणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ग्रामीण भागासाठी महत्त्वाच्या असतात. गावांमधील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, शिक्षण, स्वच्छता आणि विविध विकासकामांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची भूमिका महत्त्वाची असते. या संस्थांच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या जातात. त्यामुळे स्थानिक पातळीवर नागरिकांचे प्रश्न मांडणारे आणि विकासकामांचा पाठपुरावा करणारे प्रतिनिधी निवडून येणे आवश्यक मानले जाते.

निवडणुका जाहीर झाल्यानंतर विविध राजकीय पक्षांमध्ये उमेदवारीसाठी हालचाली वाढू शकतात. स्थानिक पातळीवरील आघाड्या, युती आणि इच्छुक उमेदवारांची समीकरणेही स्पष्ट होऊ लागतील. अनेक ठिकाणी स्थानिक प्रश्नांबरोबरच पक्षांची ताकद आणि उमेदवारांचा जनसंपर्क हे मुद्दे निवडणुकीत महत्त्वाचे ठरू शकतात.

आरक्षणाच्या मुद्द्यावर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या आत ठेवण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी लागू असलेल्या ओबीसी आरक्षण पद्धतीनुसार निवडणुका घेण्याच्या मुद्द्याचाही या प्रक्रियेत संदर्भ आहे. या कायदेशीर बाबींचे पालन करून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाकडून अधिकृत कार्यक्रम जाहीर झाल्यानंतरच निवडणुकांचे नेमके चित्र स्पष्ट होईल. मतदान आणि मतमोजणीच्या तारखा जाहीर झाल्यावर राजकीय पक्षांना प्रचाराचे नियोजन करता येईल. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर आता आयोग पुढे कोणती पावले उचलतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

कुंजीरवाडीत झोपलेल्या ट्रकचालकांचे मोबाईल आणि रोख रक्कम लंपास

लोणी काळभोर, ता. २९ : सोलापूरहून पुण्याकडे ३५ टन सिमेंट घेऊन येणाऱ्या ट्रकचालक आणि त्याच्या हेल्परला कुंजीरवाडी येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ चोरट्यांनी लक्ष्य केले. ट्रक बाजूला उभा करून दोघे झोपले असताना त्यांच्या खिशातील दोन महागडे मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ४७ हजार ४९९ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी पहाटे घडली.

याप्रकरणी अविनाश सुभाष पवार (वय २९, रा. एकुर्का, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाश पवार हे कुंजीरवाडी येथील सिद्धिविनायक ट्रान्सपोर्टमध्ये ट्रकचालक म्हणून काम करतात, तर त्यांचा भाऊ किरण पवार हा हेल्पर म्हणून काम करतो.

अविनाश पवार यांनी सोलापूर येथील चेट्टीनाड कंपनीतून १६ टायरच्या टाटा ट्रकमध्ये ३५ टन सिमेंट २३ ऑक्टोबर रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास भरले आणि पुण्याच्या दिशेने प्रवास सुरू केला. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ते कुंजीरवाडी येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ पोहोचले. झोप येत असल्याने त्यांनी ट्रक पेट्रोल पंपाच्या एका बाजूला उभा केला आणि दरवाजा बंद करून ते दोघे झोपी गेले.

मीनाक्षी शिंदेंचा महिला आघाडी प्रमुखपदाचा तडकाफडकी राजीनामा

ठाणे, ता. २९ : शिवसेनेच्या (शिंदे गट) ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख आणि माजी महापौर मीनाक्षी राजेंद्र शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला आहे. ठाकरे गटाचे मानपाडा विभागप्रमुख प्रदीप (बाळू) पूर्णेकर हत्या प्रकरणात नाव जोडले गेल्यानंतर आणि विरोधकांचा वाढता दबाव पाहता त्यांनी हे पाऊल उचलले आहे.

काही दिवसांपूर्वी ठाण्यात प्रदीप पूर्णेकर यांची धारदार शस्त्रांनी वार करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपी

हत्येच्या आधी आणि नंतर मीनाक्षी शिंदे तसेच त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा दावा विरोधकांनी आणि पूर्णेकर यांच्या कुटुंबाने केला होता. या आरोपांमुळे संशयितांच्या यादीत शिंदे दांपत्याचे नाव आले. यानंतर ठाकरे गट आणि पूर्णेकर समर्थकांनी शिंदे दांपत्याला सह-आरोपी करून अटकेची मागणी करत ठाण्यात जोरदार आंदोलने केली होती.

राजीनामा पत्रात मीनाक्षी शिंदे यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्याविरोधात राजकीय षडयंत्र रचले जात असल्याचे सांगत त्या म्हणाल्या, ज्या घटनेशी माझा थेट किंवा अप्रत्यक्ष काहीही संबंध नाही, त्यात माझे नाव ओढले जात आहे. सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन पक्षाच्या नेतृत्वाला आणि पालकमंत्र्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे मला खूप मानसिक त्रास होत आहे.

आपली ही भूमिका कोणत्याही नाराजीतून नसून केवळ पक्षाची आणि पक्षश्रेष्ठींची प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून घेतली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माझ्यामुळे पक्षावर अथवा नेतृत्वावर शिंतोडे उडणे मला मान्य नाही, म्हणूनच पक्षावरील निष्ठा सिद्ध करण्यासाठी आणि पक्षाची प्रतिष्ठा जपण्यासाठी मी या पदाचा त्याग करत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

चारित्र्य पडताळणीसाठी मोबाईलवर बनवला बनावट भाडेकरार

लोणी काळभोर पोलिसांकडून एकाला अटक

लोणी काळभोर, ता. २९ : चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मूळ भाडेकरारनाम्याच्या पीडीएफ फाइलमध्ये मोबाईलद्वारे फेरफार करून बनावट दस्तऐवज तयार केल्याचा धक्कादायक प्रकार लोणी काळभोर पोलीस ठाण्यात उघडकीस आला आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या नावावरील मूळ भाडेकरारामध्ये बदल करून त्याचा वापर चारित्र्य पडताळणी प्रक्रियेसाठी केल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. चेतन मार्कस पवार (वय ३८, रा. यश हाईट्स, फ्लॅट क्रमांक ४०३, त्रिवेणीनगर, भेकराईनगर, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. महिला पोलीस हवालदार वैशाली नागवडे यांनी कागदपत्रांची बारकाईने तपासणी केल्यामुळे हा प्रकार समोर आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश श्रीहरी केदार हा चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील चारित्र्य पडताळणी विभागात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी आला होता. त्याने अर्जासोबत भाडेकरारनामा आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. कागदपत्रांची तपासणी करताना महिला पोलीस हवालदार वैशाली नागवडे यांना भाडेकरारातील माहिती आणि केदार याने सांगितलेल्या राहत्या पत्त्याबाबत संशय निर्माण झाला. केदार याच्याकडे राहत्या पत्त्याबाबत विचारणा केली असता, त्याला समाधानकारक माहिती देता आली नाही. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे घरमालकाचा मोबाईल क्रमांक मागितला. त्यावेळी त्याने चेतन पवार याचे नाव सांगितले. आपण भेकराईनगर येथे राहत असल्याचेही त्याने पोलिसांना सांगितले. मात्र, सादर केलेल्या कागदपत्रांमधील माहिती आणि प्रत्यक्ष वास्तव्याबाबतच्या तपशिलात विसंगती आढळल्याने पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली. पोलिसांनी संबंधित घरमालक नारायण पवार यांच्याकडे चौकशी केली असता, उमेश केदार हा संबंधित घराचा भाडेकरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्या घरात संदेश सोनकांबळे हा भाडेकरू असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे चारित्र्य पडताळणीसाठी सादर करण्यात आलेल्या भाडेकरारनाम्याच्या सत्यतेबाबत पोलिसांचा संशय अधिक बळावला. कदमवाकवस्ती येथील कवडीपाट परिसरातील लक्ष्मीनारायण कृपा, गट क्रमांक १०२८ या ठिकाणच्या घरासंदर्भातील मूळ भाडेकरारनाम्याच्या पीडीएफ फाइलमध्ये मोबाईलद्वारे संपादन करून बदल करण्यात आल्याचा आरोप आहे. मूळ दस्तऐवजातील माहितीमध्ये फेरफार करून उमेश श्रीहरी केदार याच्या नावाने भाडेकरार तयार करण्यात आला आणि तो खरा असल्याचे भासवून चारित्र्य पडताळणी प्रक्रियेत सादर करण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

दरम्यान, आज अनेक शासकीय आणि प्रशासकीय कामांसाठी डिजिटल कागदपत्रांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत मूळ दस्तऐवजातील माहितीमध्ये मोबाईलवरून बदल करून बनावट कागदपत्र तयार केल्याचा हा प्रकार गंभीर मानला जात आहे. चारित्र्य पडताळणीसारख्या प्रक्रियेत सादर होणाऱ्या कागदपत्रांची सत्यता तपासणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

संक्षिप्त

हडपसरमधील तरुणाला लाखोंचा गंडा

हडपसर, ता. २९ : शेअर मार्केटमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून हडपसरमधील अमरसिंह बोबडे (वय ३४) यांची २ लाख ६१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. फेसबुकवरील जाहिरातीतून संपर्क साधल्यानंतर त्यांना ए११ आदित्य बिर्ला प्रॉफिट ग्रुप या व्हॉट्सप ग्रुपमध्ये सहभागी करण्यात आले. त्यानंतर शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली विविध बँक खात्यांवर पैसे भरण्यास सांगण्यात आले. बोबडे यांनी ५ ते २६ डिसेंबर २०२४ दरम्यान एकूण २ लाख ६१हजार रुपये भरले. संबंधित पवर ५२ लाख रुपयांचा नफा दिसल्यानंतर त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आणखी ६ लाख रुपये भरण्याची मागणी करण्यात आली. संशय आल्याने त्यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रतिसाद मिळाला नाही. याप्रकरणी त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दिली असून, संबंधित व्हॉट्सप ग्रुप डमिन आणि बँक खातेदारांविरोधात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

फुरसुंगीत गांजाचे सेवन करताना एकाला पकडले

फुरसुंगी, ता. २९ : फुरसुंगी गावातील बसथांब्याजवळ दशक्रिया विधीच्या ठिकाणामागे चिलीममधून गांजाचे सेवन करताना धनराज महादेव कांबळे (वय ५२, रा. फुरसुंगी) यांना पोलिसांनी पकडले. ही कारवाई २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास करण्यात आली. फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या सूचनेनुसार तपास पथकाने परिसरात कारवाई केली. यावेळी संशयित व्यक्ती चिलीममध्ये पदार्थ टाकून त्याचे सेवन करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. चौकशीत संबंधित व्यक्तीने गांजाचे सेवन करत असल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात नेले. घटनास्थळी मिळालेले चिलीम, आगपेटी आणि जळालेल्या काड्या नष्ट करण्यात आल्या. याप्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) आणि २७ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार खामगळ करीत आहेत.

मंतरवाडी चौकात अवजड ट्रकची मनाई आदेशाला केराची टोपली

फुरसुंगी, ता. २९ : पुणे शहरात अवजड वाहनांना २४ तास प्रवेशबंदी असतानाही मंतरवाडी चौकातून ट्रक घेऊन जाणाऱ्या चालकावर फुरसुंगी वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत चालकाला एकूण १५०० रुपयांची दंडाची चलने बजावण्यात आली. ही घटना २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास मंतरवाडी चौकात घडली. अभिलाख सिंग अरविंद कुमार (वय २९, रा. उत्तर प्रदेश) हा हरियाणातील नोंदणी असलेला सहाचाकी ट्रक घेऊन हांडेवाडी रस्त्यावरून कात्रजच्या दिशेने जात होता. पुणे शहरातील अवजड वाहनांच्या प्रवेशबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचे वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर वाहतूक नियमांचे उल्लंघन, पोलीस आदेशाचे उल्लंघन आणि सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी प्रत्येकी ५०० रुपयांची, अशी एकूण १५०० रुपयांची चलने बजावण्यात आली. याप्रकरणी फुरसुंगी वाहतूक विभागाकडून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

सिंहगड लॉ कॉलेजमध्ये DPCA २.० राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

पुणे, ता. २९ : विधी विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञान, प्रभावी कायदेशीर मसुदालेखन आणि न्यायालयीन युक्तिवादाची कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने सिंहगड लॉ कॉलेज, पुणे येथे आयोजित Drafting, Pleading, Conveyancing and dvocacy Skills (DPC 2.0) ही दुसरी राज्यस्तरीय कार्यशाळा १९ ऑक्टोबर रोजी उत्साहात संपन्न झाली. From Pen to Persuasion ही संकल्पना असलेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध विधी महाविद्यालयांतील ३५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे लोकसभा सदस्य आणि विशेष सरकारी वकील पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांनी विद्यार्थ्यांना आपल्या प्रदीर्घ वकिली कारकिर्दीतील अनुभव सांगितले. महत्त्वाच्या खटल्यांतील न्यायालयीन प्रक्रिया, प्रभावी युक्तिवादाचे महत्त्व तसेच वकिली व्यवसायासाठी आवश्यक असलेली शिस्त, सखोल अभ्यास आणि समर्पण याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई येथील विभागप्रमुख व वरिष्ठ सहाय्यक प्राध्यापक डॉ. अभिजित रोही यांनी Art of Persuasion या विषयावर मार्गदर्शन केले. प्रभावी संवादकौशल्य, तर्कशुद्ध मांडणी आणि न्यायालयासमोर आपले म्हणणे पटवून देण्याची कला यांचे महत्त्व त्यांनी विशद केले.

मुंबई उच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. पुष्कर पाटील यांनी अचूक व प्रभावी कायदेशीर मसुदालेखन, तर ॲड. भाग्यश्री सोर्तुर यांनी फौजदारी प्रकरणांतील मसुदालेखन आणि बचाव पक्षाची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. मुंबई उच्च न्यायालयातील वकील आणि पुणे बार असोसिएशनचे ऑडिटर ॲड. शिवराज निंबाळकर यांनी न्यायालयीन युक्तिवाद, वकिलांची व्यावसायिक जबाबदारी आणि न्यायालयीन शिष्टाचार यांवर प्रकाश टाकला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष वकिली व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती मिळाली. कायदेशीर मसुदालेखन, फौजदारी प्रकरणांतील प्लीडिंग आणि प्रभावी युक्तिवाद यांचा व्यावहारिक अनुभव समजून घेण्यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरले.

सिंहगड लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शिल्पा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्राध्यापक समन्वयक प्रा. कीर्ती कांबळे आणि प्रा. अमोल शेलार, तसेच विद्यार्थी समन्वयक निलय जयवंत जगताप आणि समर खोपडे यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या दृष्टीने DPC २.० कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

पिंपरीत शाळेच्या कार्यालयात शिक्षकाला बेदम मारहाण

पिंपरी-चिंचवड, ता. २९ : तळवडे येथील नवमहाराष्ट्र माध्यमिक विद्यालयात एका शिक्षकाला कार्यालयात बोलावून अपमानित करत मारहाण केल्याचा आरोप समोर आला आहे. तसेच शिक्षकाला जोरात भिंतीवर ढकलल्याने त्यांच्या डोक्याला दुखापत झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी संस्थेच्या दोन पदाधिकाऱ्यांविरोधात चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ ऑक्टोबर रोजी घडल्याचे सांगण्यात आले. दिलीप दत्तात्रय पांडुळे (वय ३९, रा. माळीनगर, देहूगाव) यांनी याप्रकरणी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, पांडुळे हे शाळेत विद्यार्थ्यांना शिकवत असताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना कार्यालयात बोलावून घेतले. कार्यालयात बोलावल्यानंतर आपला अपमान करून मारहाण करण्यात आल्याचा आरोप पांडुळे यांनी फिर्यादीत केला आहे.

लोणी स्टेशन चौकात धोकादायक पद्धतीने वाहन उभे करणाऱ्यावर गुन्हा

लोणी काळभोर, ता. २९ : पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी स्टेशन चौक परिसरात वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून सार्वजनिक रस्त्यालगत धोकादायक पद्धतीने वाहन उभे केल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी एका वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मस्तान बाबासाहेब शेख (वय ४२, रा. ससाणेनगर, हडपसर, पुणे) असे संबंधित चालकाचे नाव आहे. रस्त्यावर बेदरकारपणे वाहन उभे केल्याने मानवी जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका पोलिसांनी घेतली आहे.

पोलिसांनीदिलेल्यामाहितीनुसार, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच रस्त्यावर धोकादायक पद्धतीने उभ्या असलेल्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी अधिकारी व अंमलदारांना २३ ऑक्टोबर २०२६ रोजी दिले होते. त्यानुसार पोलीस पथक परिसरात गस्त घालत होते.

दरम्यान, दुपारी सुमारे अडीज वाजण्याच्या सुमारास लोणी स्टेशन चौकाजवळ पुणे-सोलापूर महामार्गावर मारुती सुझुकी कंपनीचे कॅरिअर वाहन रस्त्यालगत धोकादायक स्थितीत उभे असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी संबंधित वाहनाच्या चालकाचा शोध घेतला.

काही वेळाने मस्तान शेख हा वाहनाजवळ आला. पोलिसांनी त्याच्याकडे वाहन धोकादायक पद्धतीने का उभे केले, याबाबत विचारणा केली असता, कामगारांना घेण्यासाठी वाहन थांबवल्याचे त्याने सांगितले. मात्र, सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन उभे केल्याने इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो, असे पोलिसांच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक पूजा विष्णू माळी यांनी सरकारतर्फे तक्रार दिली आहे. सार्वजनिक रस्त्यांवर वाहने उभी करताना वाहतुकीला अडथळा होणार नाही आणि अपघाताचा धोका निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. महामार्गावरील वाहतूक सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांकडून नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जात असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

पुण्यातून दिवाळी–छठ पूजेसाठी ४५० विशेष गाड्या

पुणे, ता. २९ : दिवाळी आणि छठपूजेच्या निमित्ताने गावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेने दिलासादायक निर्णय घेतला आहे. या सणांच्या काळात होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पुणे विभागातून तब्बल ४५० विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्याची योजना आखली आहे. या विशेष गाड्या १ नोव्हेंबरपासून पुणे, हडपसर आणि खडकी या तिन्ही प्रमुख स्थानकांवरून धावतील. यामुळे उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेशकडे जाणाऱ्या नागरिकांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे.

पुणे रेल्वे स्थानकावरून दानापूरसाठी दररोज विशेष ट्रेन सोडली जाईल. गाडी क्रमांक ०१४४९ पुण्यावरून दुपारी ३.४० वाजता सुटेल, तर दानापूरहून गाडी क्रमांक ०१४५० पहाटे ५.०० वाजता पुण्यासाठी रवाना होईल. या मार्गावर सर्वाधिक म्हणजेच ६३ फेऱ्या होणार आहेत. याशिवाय अमरावतीसाठी ७ आणि मुझफ्फरपूरसाठी ६ विशेष फेऱ्यांचे नियोजन आहे.

हडपसर स्थानकावरून गोरखपूरसाठी ३२ फेऱ्या चालवल्या जातील. गाडी क्रमांक ०१४१५ हडपसरवरून सकाळी ७.०५ वाजता सुटेल आणि परतीची गाडी क्रमांक ०१४१६ गोरखपूरवरून सायंकाळी ५.३० वाजता निघेल. हडपसरवरून नागपूरसाठी १५, गाझीपूरसाठी १२ आणि प्रयागराजसाठी ५ फेऱ्या होतील. खडकी स्थानकावरून हजरत निजामुद्दीनसाठी सायंकाळी ५.३० वाजता ट्रेन सुटेल, ज्याच्या १४ फेऱ्या होतील. तसेच खडकी-सांगानेर मार्गावर ६ फेऱ्या नियोजित आहेत. सणांच्या काळात नियमित गाड्यांमध्ये कन्फर्म तिकीट मिळणे कठीण होते. त्यामुळे या अतिरिक्त गाड्यांमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल.

पीएम किसानचा २४ वा हप्ता आज येणार?

पुणे, ता. २९ : पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा २४ वा हप्ता उद्या ३० ऑक्टोबर रोजी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातच्या बनासकांठा येथून या हप्त्याचे वितरण करणार आहेत. या माध्यमातून देशभरातील ९.३४ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना १८ हजार ६८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळणार आहे.उद्या पैसे जमा होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता आहे.

या पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा २४ वा हप्ता आपल्याला मिळणार का आणि आपले नाव पात्र यादीत आहे का, याबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत. घरबसल्या मोबाईलवर काही सोप्या स्टेप्स फॉलो करून स्टेटस तपासता येऊ शकते.त्यासाठी सर्वांत आधी पीएम किसानच्या अधिकृत वेबसाईटला भेट देऊन तिथे होमपेजवर 'Know Your Status' या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर तुमचा नोंदणी क्रमांक म्हणजेच रजिस्ट्रेशन नंबर एंटर करा.त्यानंतर स्क्रीनवर विचारलेली माहिती भरून ओटीपीद्वारे पडताळणी पूर्ण करा.यानंतर तुम्हाला तुमचा हप्ता आणि स्टेटस स्क्रीनवर दिसेल.

जर तुमच्या स्टेटसमध्ये 'Withheld' असा शब्द दिसत असेल, तर तुमचा हप्ता तात्पुरता रोखला गेला असण्याची शक्यता आहे. तसेच 'Under Verification' किंवा 'Eligibility Under Review' असा शेरा असल्यास, कागदपत्रांची पडताळणी प्रक्रियेत आहे असे समजावे. अशा वेळी तातडीने पोर्टलवर जाऊन अपूर्ण असलेली कागदपत्रे आणि ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, जेणेकरून पैसे अडकणार नाहीत.

ज्या कुटुंबांकडे शेतजमीन आहे आणि जे या योजनेच्या सर्व अटींमध्ये बसतात, त्यांनाच या योजनेचा आर्थिक लाभ मिळतो. मात्र काही जण यातून वगळण्यात आले आहेत. यामध्ये सरकारी नोकरी करणारे कर्मचारी, प्राप्तिकर म्हणजेच इन्कम टॅक्स भरणाऱ्या व्यक्ती, तसेच संस्थात्मक जमीनधारक शेतकरी या योजनेसाठी अपात्र ठरतात. त्यामुळे उद्या पैसे जमा होण्यापूर्वी सर्व शेतकऱ्यांनी आपले स्टेटस ऑनलाईन तपासून खात्री करून घेणे गरजेचे आहे.

पुण्यात जावयावर जीवघेणा हल्ला

पुणे, ता. २९ : पुण्यातील चिंचवड भागात कौटुंबिक वादातून एका तरुणाला त्याच्या सासरच्या मंडळींनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुले मातीत खेळत आहेत हे सांगायला गेलेल्या जावयाला सासरच्या लोकांनी शिवीगाळ करत सिमेंटच्या पेव्हर ब्लॉकने डोक्यात आणि पाठीवर मारून गंभीर जखमी केले. निगडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिंचवड येथील अजंथानगर परिसरात नेहाल रमेश गायकवाड (वय ३१) हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांच्या घराच्या शेजारीच त्यांचे सासर आहे. घटनेच्या दिवशी त्यांची पत्नी माहेरी गेलेली होती. दरम्यान, आपली मुले बाहेर मातीत खेळत असल्याचे नेहाल यांच्या निदर्शनास आले. हेच सांगण्यासाठी ते पत्नीच्या माहेरी गेले होते. मात्र, तिथे पोहोचताच सासरच्या लोकांनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली.

आरडाओरडा आणि दमदाटी करत सासरच्या मंडळींनी नेहाल यांना मारहाण करण्यास सुरवात केली. याच रागातून समाधान सुनील लांडगे (वय २०) या तरुणाने थेट सिमेंटचा पेव्हर ब्लॉक उचलून नेहाल यांच्या डोक्यात, हातावर आणि पाठीवर मारला. ही घटना १७ ऑक्टोबर रोजी घडली होती. यानंतरही सासरच्या मंडळींचा राग शांत झाला नव्हता.

२७ ऑक्टोबर रोजी नेहाल कामावर जाण्यासाठी घरातून बाहेर पडले असता, सासरच्या लोकांनी त्यांना रस्त्यात गाठून पुन्हा मारहाण केली. वारंवार होणाऱ्या या त्रासाला आणि हल्ल्याला कंटाळून अखेर नेहाल यांनी पोलिसांत धाव घेतली. या घटनेनंतर पीडित पतीने निगडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्राप्त तक्रारीवरून समाधान लांडगे याच्यासह तीन महिलांविरोधात मारहाण आणि दमदाटीचा गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

५ पैकी ३ जागा जिंकण्याची किमया शरद पवारांनी करून दाखवली : हर्षदा देशमुख

पुणे, ता. २९ : पुणे विभागातील विधान परिषद निवडणुकांमध्ये महायुतीला मोठा धक्का बसला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महाविकास आघाडी उमेदवार हर्षदा देशमुख यांनी या पदवीधर मतदारसंघात दणदणीत विजय मिळवला. या यशानंतर त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन आभार मानले. भेटीनंतर बोलताना त्या म्हणाल्या कि , ५ पैकी ३ जागा कशा जिंकतात हे शरद पवारांनी करून दाखवलं . त्यांचं सातत्याच मार्गदर्शन आम्हाला मिळालं असं त्या म्हणाल्या.

हर्षदा देशमुख यांनी नमूद केले की, तरुणांचे तसेच एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि शिक्षण क्षेत्रातील समस्या गंभीर आहेत. या निकालामुळे महाविकास आघाडीला नक्कीच नवी ताकद मिळाली आहे. निवडणुकीत भाजप आणि शिंदे गटातील नाराजी उघड झाली असून त्यांच्या कार्यकर्त्यांची फळी असमाधानी होती. काँग्रेस नेते आमदार रवींद्र धंगेकर यांच्या प्रकृतीबाबत विचारले असता, त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी त्यांना निश्चितपणे फोन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही निवडणूक कोणत्या एका नेत्याभोवती केंद्रित नसून, मतदारांनी आणि जनतेने ती स्वतःच्या हातात घेतली होती, असे त्यांनी स्पष्ट केले.

पश्चिम महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांमध्ये फिरताना लोकांमध्ये तीव्र असंतोष दिसून आला आणि तोच रोष या निकालातून व्यक्त झाला आहे. शिक्षकांमध्येही सरकारच्या धोरणांबद्दल नाराजी असून शिक्षक मतदारसंघाच्या मतदाना दरम्यान बोगस मतदान झाल्याचा गंभीर दावाही हर्षदा देशमुखांनी केला आहे.

दरम्यान पदवीधर आणि शिक्षक या दोन्ही जागांवर महायुतीमध्ये उमेदवारीवरून बराच ताणतणाव निर्माण झाला होता. अगदी शेवटच्या टप्प्यात भाजपने दोन्ही जागांवर उमेदवार जाहीर केले, तर शिंदे गटानेही शिक्षक मतदारसंघात आपला उमेदवार मैदानात उतरवला. मात्र, या राजकीय गदारोळात पदवीधर मतदारसंघात भाजपला पराभवाचा सामना करावा लागला.

वाघोलीतील लाइफलाईन हॉस्पिटल जवळ दोघांना ५ ते ७ जणांची मारहाण

वाघोली, ता. २९ : मुलांच्या भांडणातून जखमी झालेल्या मुलाच्या उपचारांचा खर्च देण्यासाठी रुग्णालयात गेलेल्या दोघांना दुचाकीस्वारांसोबत झालेल्या शाब्दिक वादातून मारहाण करण्यात आली. वाघोली (ता. हवेली) येथील लाइफलाईन हॉस्पिटल परिसरात घडली. याप्रकरणी सुमित भास्कर हिवाळे यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार गणेश संतोष देसाई, ऋषिकेश बाळासाहेब गुणवारे (पूर्ण पत्ता माहिती नाही) व त्यांच्यासोबत आलेल्या इतर ५ ते ६ अज्ञात व्यक्तींनी मारहाण व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमित हिवाळे हे मागील सहा वर्षांपासून केशवभाऊ राखपसरे यांच्याकडे चालक म्हणून काम करतात. २७ ऑक्टोबर रोजी केशवभाऊ राखपसरे यांच्याकडे काम करणाऱ्या किशोर भालेराव यांच्या मुलाचे शाळेतील एका मुलासोबत भांडण झाले होते. या घटनेत जखमी झालेल्या मुलावर लाइफलाईन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. उपचारांचा खर्च देण्यासाठी किशोर यांनी फोन करून सुमित यांना रुग्णालयात बोलावले होते.

त्यानुसार, सायंकाळी साडेचारच्या सुमारास हिवाळे आणि राखपसरे हे रुग्णालयाच्या परिसरात कठड्यावर बसले होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या गणेश देसाई आणि ऋषिकेश गुणवारे यांच्याशी त्यांचा वाद झाला. दुचाकी अंगावर घालण्याच्या पद्धतीने जवळ आणल्याबाबत विचारणा केल्यानंतर संबंधितांनी शिवीगाळ सुरू केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

यानंतर रुग्णालयात असलेल्या संबंधितांच्या ओळखीतील व्यक्ती आणि नातेवाइकांना बोलावण्यात आले. त्यानंतर पाच ते सहा जणांनी हिवाळे आणि राखपसरे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून तेथून जाऊ न देण्याची आणि पुन्हा पाहून घेण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे. या झटापटीदरम्यान हिवाळे यांच्या हातातील चांदीचे ब्रेसलेट हरवल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, रुग्णालयातील घटनेनंतर हिवाळे हे पोलिस ठाण्याकडे जात असताना, सोमेश्वर वडापाव येथे राखपसरे यांना पाच ते सहा जणांनी पुन्हा मारहाण केल्याचे हिवाळे यांनी जबाबात म्हटले आहे. या प्रकरणी हिवाळे यांनी तक्रार दिली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

महाराष्ट्राला मिळाली पहिली 'वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस'!

पुणे, ता. २९ : मुंबई ते बंगळूरदरम्यान प्रस्तावित वंदे भारत स्लीपर एक्सप्रेसच्या सेवेकडे रेल्वे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. या रेल्वेचे उद्घाटन १ नोव्हेंबर २०२६ रोजी होण्याची आणि नियमित सेवा ३ नोव्हेंबरपासून सुरू होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, याबाबत रेल्वेची अधिकृत घोषणा आणि अंतिम वेळापत्रक निश्चित होणे बाकी आहे. या रेल्वेमुळे पुणे ते बंगळूर प्रवासासाठी लागणारा वेळ सुमारे पाच तासांनी कमी होऊन प्रवास १३ तासांत पूर्ण होऊ शकतो, असा दावा करण्यात येत आहे. ही सेवा सुरू झाल्यास महाराष्ट्र आणि कर्नाटकदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास बंगळूर रेल्वे स्थानकावर वंदे भारत स्लीपर एक्सप्रेसची उद्घाटनपर फेरी सुरू होण्याचे नियोजन आहे. या फेरीदरम्यान रायचूर, यादगीर, कलबुर्गी, सोलापूर आणि पुणे या स्थानकांवर गाडीचे स्वागत करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. उद्घाटनपर फेरी रविवारी रात्री सुमारे ११ वाजता पुणे स्थानकावर दाखल होण्याची शक्यता आहे. येथे १० ते १५ मिनिटांचा थांबा घेतल्यानंतर रेल्वे मुंबईच्या दिशेने रवाना होईल आणि सोमवारी पहाटे सुमारे ३ वाजता मुंबईत पोहोचण्याचे नियोजन असल्याचे वृत्त आहे.

प्रस्तावित वेळापत्रकानुसार, वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस आठवड्यातून सहा दिवस धावणार आहे. बंगळूरहून दर सोमवारी, तर मुंबईहून दर मंगळवारी ही सेवा बंद राहण्याचे नियोजन असल्याचे सांगितले जात आहे. बंगळूर ते मुंबई प्रवासासाठी प्रस्तावित वेळापत्रकानुसार गाडी क्रमांक २७६५२ बंगळूरहून सायंकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी सुटेल. ती सोलापूरला पहाटे ४ वाजून २० मिनिटांनी, पुण्याला सकाळी ८ वाजता आणि मुंबईला सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी पोहोचण्याचे नियोजन आहे. मुंबई ते बंगळूर प्रवासासाठी प्रस्तावित गाडी क्रमांक २७६५१ मुंबईहून रात्री ८ वाजून १० मिनिटांनी सुटेल. ही गाडी पुण्याला रात्री ११ वाजून ४० मिनिटांनी, सोलापूरला पहाटे ३ वाजता आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजता बंगळूरला पोहोचण्याची शक्यता आहे. हे वेळापत्रक अंतिम अधिकृत घोषणेनुसार बदलू शकते.

प्रस्तावित वंदे भारत स्लीपर एक्सप्रेसमध्ये एकूण १६ वातानुकूलित डबे असतील. या रेल्वेची प्रवासी क्षमता ८२३ इतकी असल्याचे सांगितले जात आहे. यामध्ये एसी थ्री टियरचे ११ डबे असून त्यात ६११ बर्थ असतील. एसी टू टियरचे चार डबे असून त्यांची क्षमता १८८ बर्थ इतकी असेल. तर एसी प्रथम श्रेणीचा एक डबा असून त्यात २४ बर्थ असतील.

मुंबई, पुणे, सोलापूर आणि बंगळूरदरम्यान नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही रेल्वे सुरू झाल्यास आरामदायी आणि जलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध होऊ शकतो. मात्र, सेवा सुरू होण्याची तारीख, गाडी क्रमांक, थांबे आणि वेळापत्रक याबाबत प्रवाशांनी रेल्वेच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा करणे आवश्यक आहे.

पुणे प्राईम न्यूज
जनमानसाचा निडर आवाज...

३० लाखांच्या लुटीची नोंद मिसिंगमध्ये! मार्केटयार्डच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचे निलंबन

पुणे, ता. २९ : मार्केट यार्ड परिसरात व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याला अडवून ३० लाख रुपये लुटल्याचा गंभीर प्रकार घडला असताना, या घटनेची नोंद दरोड्याऐवजी मिसिंग म्हणून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात गंभीर निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मार्केटयार्ड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत भाऊसाहेब जगताप यांना तडकाफडकी निलंबित केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी मार्केटयार्ड परिसरात एका व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याकडील ३० लाख रुपये दुचाकीवरून आलेल्या पाच जणांच्या टोळक्याने लुटून नेले होते. या गंभीर घटनेची नोंद योग्य स्वरूपात न करता मिसिंग म्हणून करण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीत समोर आले. दरोड्यासारखा गंभीर गुन्हा दडपण्याचा प्रकार प्रथम दर्शनी निष्पन्न झाल्याने संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

दरम्यान, स्वारगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सॅलसबरी पार्क परिसरात एका व्यापाऱ्याला मारहाण करून त्याच्याकडील साडेचार लाख रुपयांची बॅग हिसकावण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, व्यापाऱ्याने बॅग न सोडल्याने आणि नागरिक जमा होऊ लागल्याने आरोपी पळून गेले होते. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी जबरी चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

दरम्यान, परिसरातील सुमारे २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासल्यानंतर निहाल नवनाथ अडागळे (वय-१९, रा. मुंढवा) आणि यश प्रवीण सोनवणे (वय-२४, रा. मांजरी) या दोघांना अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींकडे चौकशी केली असता, त्यांनी मार्केटयार्ड परिसरात व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याला लुटून ३० लाख रुपये चोरल्याची कबुली दिल्याचे समोर आले. त्यानंतर या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी केली. यावेळी मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद मिसिंग म्हणून करण्यात आल्याचे उघड झाले.

दरम्यान, या प्रकारामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गंभीर गुन्ह्याची योग्य नोंद न करणे, ही बेजबाबदारपणाची बाब असून, त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलिन होत असल्याचे नमूद करत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत जगताप यांच्यावर निलंबनाची कारवाई केली.

झोपलेल्या ट्रक चालकांचे मोबाईल आणि रोख रक्कम लंपास

लोणी काळभोर, ता. २९ : सोलापूरहून पुण्याकडे ३५ टन सिमेंट घेऊन येणाऱ्या ट्रकचालक आणि त्याच्या हेल्परला कुंजीरवाडी येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ चोरट्यांनी लक्ष्य केले. ट्रक बाजूला उभा करून दोघे झोपले असताना त्यांच्या खिशातील दोन महागडे मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ४७ हजार ४९९ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी पहाटे घडली.

याप्रकरणी अविनाश सुभाष पवार (वय २९, रा. एकुर्का, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाश पवार हे कुंजीरवाडी येथील सिद्धिविनायक ट्रान्सपोर्टमध्ये ट्रकचालक म्हणून काम करतात, तर त्यांचा भाऊ किरण पवार हा हेल्पर म्हणून काम करतो.

अविनाश पवार यांनी सोलापूर येथील चेट्टीनाड कंपनीतून १६ टायरच्या टाटा ट्रकमध्ये ३५ टन सिमेंट २३ ऑक्टोबर रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास भरले आणि पुण्याच्या दिशेने प्रवास सुरू केला. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ते कुंजीरवाडी येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ पोहोचले. झोप येत असल्याने त्यांनी ट्रक पेट्रोल पंपाच्या एका बाजूला उभा केला आणि दरवाजा बंद करून ते दोघे झोपी गेले.

दरम्यान, सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दोघे जागे झाल्यानंतर त्यांना आपले मोबाईल आणि पैशांचे पाकीट आढळून आले नाही. ट्रकमध्ये तसेच स्वतःच्या खिशात शोध घेतल्यानंतरही ऐवज मिळाला नाही. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने झोपेचा फायदा घेत चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

चोरीस गेलेल्या ऐवजात २६ हजार ९९९ रुपये किमतीचा ओप्पो एफ ३१ मोबाईल, १८ हजार रुपये किमतीचा ओप्पो ए ५ मोबाईल आणि अडीच हजार रुपये रोख रकमेचा समावेश आहे. एकूण ४७ हजार ४९९ रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सासवड-भिवरी रस्त्यावर टेम्पोच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

सासवड, ता. २९ : सासवड-भिवरी-बोपगाव रस्त्यावर भरधाव टेम्पोने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास भिवरी गावच्या हद्दीत घडला. अपघातानंतर टेम्पो घटनास्थळी सोडून चालक पसार झाला. गिरीश गोरख कोलते (वय २५, रा. पिसर्वे, ता. पुरंदर) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मृत तरुणाचे काका बाळासाहेब राघू कोलते (वय ६६ , रा. पिसर्वे) यांनी सासवड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गिरीश कोलते हा दुचाकीवरून (क्र. एमएच १२ झेडझेड ३५८६) प्रवास करत होता. भिवरी गावच्या हद्दीतील ९९ बेकरीपासून सुमारे १०० मीटर अंतरावर असताना सासवडच्या दिशेने येणाऱ्या टेम्पोने (क्र. एम एच ०२ ईआर २०३२) त्याच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात गिरीशच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, अपघातानंतर जखमी तरुणाला मदत न करता चालक टेम्पो सोडून पळून गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिस कर्मचारी जाधवर या प्रकरणाचा तपास करत आहेत.

खराडीत अवैध दारूविक्रीचा पर्दाफाश

खराडी, ता. २९ : खराडीतील सातव वस्ती परिसरात अवैधपणे देशी दारू विक्री करणाऱ्या सतीश गुंडाजी फड (वय ४४) याला खराडी पोलिसांनी पकडले. ही कारवाई २८ ऑक्टोबर रोजी रात्री गुलमोहर सिटी जवळ, प्राची स्नॅक्स दुकानाशेजारी करण्यात आली.

खराडी पोलिसांचे पथक गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपीकडे देशी दारूच्या ९० मिलीच्या ५७ सीलबंद

बाटल्या आढळल्या. या दारूची किंमत २ हजार २८० रुपये असून पोलिसांनी ती जप्त केली. याप्रकरणी मुंबई दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास खराडी पोलीस करीत आहेत.

Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ

बाळाला किती दिवस आईच्या दुधाची गरज असते; झोपलेल्या बाळाला दूध पाजावे का?

आईच्या दुधात अनेक गुण असतात. हे मुलांच्या शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते. सुमारे ६ महिने स्तनपान दिल्याने बाळाला मधुमेहाचा धोका ३० टक्क्यांनी कमी होतो. बाळाला प्रथिने, जीवनसत्त्वे आणि कॅल्शियम देखील आईच्या दुधातून मिळते.

एवढेच नाही तर स्तनपानामुळे इन्सुलिनची संवेदनशीलता वाढते, त्यामुळे गर्भधारणेदरम्यान मधुमेह असलेल्या महिलांमध्ये ग्लुकोज चयापचय सुधारते. २-५ महिन्यांपेक्षा जास्त काळ स्तनपान केल्याने या मातांमध्येही टाइप २ डीएमचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

प्रश्न - बाळाला किती दिवस आईच्या दुधाची गरज असते?

उत्तर- WHO काय म्हणते ते पहा-

६ महिन्यांपर्यंत मुलाला पूर्णपणे स्तनपान दिले पाहिजे. म्हणजेच, त्याला फक्त आईचे दूध पाजावे.

२ वर्षापर्यंतच्या बालकांना बाहेरील दुधासोबत आईचे दूध पाजावे.

६ महिन्यांपर्यंत, बाळाचा आहार पूर्णपणे आईच्या दुधावर अवलंबून असतो, म्हणून मातांनी त्यांच्या आहाराकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.

प्रश्न - बाळाच्या जन्मानंतर आईने त्याला पहिल्यांदा दूध कधी पाजावे?

उत्तर- जेव्हा आई पहिल्यांदा मुलाला आपल्या कुशीत घेते, तेव्हाच दूध पाजण्याचा प्रयत्न करावा. मुलाला जन्म दिल्यानंतर, आईच्या शरीरात विशेष दूध तयार होते, ज्याला कोलोसट्रम म्हणतात. हे दूध बाळाला अनेक प्रकारच्या संसर्गापासून सुरक्षित ठेवते.

प्रश्न - स्तनपान देताना आईची मुद्रा म्हणजेच पॉश्चर कसे असावे?

उत्तर- तुम्हाला ते नीट समजावे म्हणून आम्ही तुम्हाला उत्तरे पॉइंट्समध्ये सांगत आहोत.

आईने कुशीत घेऊनच मुलाला दूध पाजावे.

सुरुवातीच्या दिवसांत आई लेड बॅक स्थितीत म्हणजेच पाठ टेकवून बसू शकते.

ही स्थिती ४० अंशांपेक्षा जास्त ठेवू नका.

मुलाचे पोट आईच्या पोटाला टेकलेले असावे.

मुलाचे डोकेआईच्या छातीला टेकलेले असावे.

आता एका हाताने बाळाचे तोंड तुमच्या स्तनाग्र म्हणजेच निप्पलजवळ आणा.

दुसऱ्या हाताने स्तनाला आधार द्या.

बाळाच्या तोंडाने केवळ निप्पलच नव्हे तर एरिओला (स्तन आणि स्तनाग्र यांच्यातील गडद भाग) देखील कव्हर होईल याची खात्री करा.

या स्थितीत, आईला बाळाला धरून ठेवण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागत नाही.

प्रश्न - झोपलेल्या बाळाला आईचे दूध पाजावे का?

उत्तर- नाही, असे करू नये. आता तुम्ही म्हणाल की नवजात बाळ बराच वेळ झोपते, अशा परिस्थितीत आई दूध कधी पाजणार? तर त्याला उठवून दर चार तासांनी दूध पाजणे हेच त्याचे उत्तर आहे. दूध पाजताना त्याला झोप लागली तर त्याला आरामात झोपू द्या. लक्षात ठेवा की नवजात बाळ काही मिनिटे किंवा तासभर सतत दूध पिऊ शकते. या सवयी पाहून अस्वस्थ होऊ नका कारण ते दूध पिण्याची योग्य सवय शिकत आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हवेली पंचायत समिती कटिबद्ध : सभापती युवराज काकडे

लोणी काळभोर, ता. २९ : विद्यार्थी हा शाळेचा अविभाज्य घटक असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतूनच शाळेची आणि गावाची प्रगती साध्य होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिष्यवृत्ती, क्रीडा तसेच विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हवेली पंचायत समितीच्या माध्यमातून आवश्यक ती मदत करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी दिली.

प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे हवेली तालुकाध्यक्ष संदीप बोडकेआणि श्लोक गणेश कुंजीर यांच्या वाढदिवसानिमित्त थेऊर (ता. हवेली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तारमळा येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा बुधवारी (ता. २९) उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सभापती काकडे बोलत होते. या कार्यक्रमाला पंचायत समितीच्या उपसभापती विद्या गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य कावेरी कुंजीर, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा काजल टेमगिरे, सदस्य रेश्मा पवार, राजश्री कुंजीर, माजी ग्रामपंचायत सदस्य विनोद माळी, राजेश केरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कथालेखनात वीर भंडारी प्रथम; विश्वनाथवाघमारेचेहस्ताक्षरस्पर्धेतयश

हवेली तालुकास्तरीय कथालेखन स्पर्धेत शाळेचा विद्यार्थी वीर सुमित भंडारी याने प्रथम क्रमांक पटकावला, तर तालुकास्तरीय हस्ताक्षर

स्पर्धेत विश्वनाथ नामदेव वाघमारे याने द्वितीय क्रमांक मिळवला. या दोन्ही विद्यार्थ्यांचे सभापती युवराज काकडे यांनी विशेष कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा आणि त्यांना विविध क्षेत्रांत प्रगतीची संधी मिळावी, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यापुढेही गणेश नारायण कुंजीर मित्र परिवाराच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतील, असे गणेश कुंजीर यांनी सांगितले. या स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

दिवाळी साहित्य विक्रीतून व्यावहारिक ज्ञानाचे धडे

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने शाळेत दिवाळी साहित्य विक्रीची दुकाने उभारण्यात आली होती. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वस्तूंची विक्री, व्यवहार आणि आर्थिक देवाणघेवाण यांची प्राथमिक माहिती मिळाली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका हिरेमठ, परदेशी, कुदळे, कुटे, सरोदे, सूर्यवंशी सर, निर्मला मॅडम आणि तारू काकूयांनी विशेष सहकार्य केले. यावेळी विठ्ठल मोरे, सुखराज कुंजीर, मनसे नेते प्रशांत खांडे, सूरज सोनावणे, समर्थ बोडके, अमोल काकडे, बाळासाहेब गायकवाड यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चित्रकला स्पर्धेतील वर्गनिहाय विजेते (पहिला, दुसरा तिसरा)

पहिली : स्वामिनी अजित बोडके, सार्थक दीपक थोरात, सारधा कुमारी, दुसरी : स्नेहल दत्तात्रय कांबळे, अकिश अंकुश राठोड, विश्वराज दत्ता शिंदे, तिसरी : राधा कुमारी, मार्तंड गणेश पोपळे, श्रुती बालाजी ढावारे, चौथी : स्वराली संतोष तुपसौंदर, श्रीराज राम शेंडगे, श्रीनिथी लखन शेंडगे, पाचवी : कुणाल बापू निकम, देवांश अजय कुंजीर, सई राहुल कुंजीर, सहावी : आदिराज नानासाहेब खेंडकर, शंभूराजे विकास कुंजीर, श्रीजित स्वप्नील भोसले, सातवी : श्रीगणेश प्रवीण व्यवहारे, अंशुमन रणजित शिंदे, गायत्री नामदेव वाघमारे.

उंडवडी सुप्यात पाण्यासाठी शेतकऱ्यांचे बेमुदत उपोषण सुरू

बारामती, ता. २९ : रब्बी हंगामासाठी शिरसाई उपसा सिंचन योजनेचे आवर्तन तातडीने सुरू करावे आणि लाभक्षेत्रातील सर्व गावांना समान पाणी मिळावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. गुरुवारी (२९ ऑक्टोबर) सकाळी १० वाजता उंडवडी सुपे येथील श्री संत तुकाराम महाराज पालखी तळावर बेमुदत चक्री उपोषणाला सुरुवात झाली. या आंदोलनात योजनेच्या लाभक्षेत्रातील १५ गावांमधील पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

खरीप हंगामात पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे उंडवडी कडेपठार, बऱ्हाणपूर आणि गोजुबावी या गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळाले नसल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे

आहे. आता रब्बी हंगाम सुरू झाला असून पिकांना पाण्याची गरज आहे. त्यामुळे खडकवासला कालव्यातून शिर्सुफळ तलावात पाणी सोडून शिरसाई योजना तातडीने सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

आंदोलन सुरू झाल्यानंतर परिसरातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देत आंदोलनाला पाठिंबा दिला. पाणीवाटपाचे स्पष्ट नियोजन आणि प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळेपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा निर्धार प्रतिनिधींनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या ६ प्रमुख मागण्या शिरसाई योजनेचे रब्बी आवर्तन त्वरित सुरू करावे, सर्व १५ गावांना न्याय्य पद्धतीने पाणी द्यावे आणि शिर्सुफळ तलावातील पाण्याची निर्धारित पातळी व शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पाण्याबाबत पाटबंधारे विभागाने लेखी माहिती द्यावी, अशा प्रमुख मागण्या आहेत. याशिवाय, तलावात योजनेसाठी स्वतंत्र बांध उभारणे, पाण्याचे अचूक मोजमाप करण्यासाठी गेज मीटर बसवणे आणि मुख्य पंपगृहासह तलाव परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणीही करण्यात आली आहे.

छत्रपती पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष सतीश गोलांडे यांनी सांगितले की, १५ गावांच्या शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आणि पाण्याचे ठोस नियोजन लेखी स्वरूपात मिळेपर्यंत बेमुदत चक्री उपोषण सुरू राहील. आता प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

संजय गायकवाडांच्या वक्तव्याने नवा वाद पेटणार?

पुणे, ता. २९ : प्रकाश आंबेडकर यांच्या एका विधानानंतर आता शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी शेतकरी आत्महत्यांविषयी केलेल्या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा वाद निर्माण झाला आहे. संजय गायकवाड यांनी म्हटले आहे की, शेतकरी कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा विचार न करता अचानक टोकाचे पाऊल उचलतात. संकट काळात आत्महत्या करण्याऐवजी त्यांनी स्थानिक आमदार किंवा खासदारांना पत्र लिहून मदत मागितली पाहिजे. त्यांनी असेही विधान केले की, अशा प्रकारे जीवन संपवणाऱ्या शेतकऱ्यांच्या अंत्यसंस्कारालासुद्धा कोणी जाऊ नये.गायकवाड यांच्या या वक्तव्यावर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी सरकारवर टीका करताना सांगितले की, कोणताही शेतकरी आवडीने स्वतःचे जीवन संपवत नाही. अस्मानी आणि सुल्तानी संकटांसोबतच जेव्हा प्रशासनाकडून कोणतीही मदत मिळत नाही, तेव्हाच शेतकरी लाचार होऊन हा निर्णय घेतात. सत्ताधारी नेत्यांच्या अशा विधानांमधून सरकारची शेतकऱ्यांप्रती असलेली असंवेदनशीलता स्पष्ट दिसून येते, असेही ते म्हणाले.

दुसरीकडे, मंत्री हसन मुश्रीफ यांनी या वक्तव्याचा निषेध करत ते अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हटले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गायकवाड यांच्यावर तातडीने कडक कारवाई करावी आणि त्यांनी सर्व शेतकऱ्यांची बिनशर्त माफी मागावी, अशी मागणी मुश्रीफ यांनी केली. तर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, ते या विधानाचे समर्थन करत नाहीत.

मुळा-मुठा नदीपात्रात आढळला तरुणीचा मृतदेह

पुणे, ता. २९ : मुंढवा परिसरातील मुळा-मुठा नदीपात्रात वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शनिवारी ही घटना उघडकीस आली. तरुणीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, मृत तरुणीच्या आईने घातपाताचा संशय व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नंदिनी दुर्गप्पा गायकवाड (वय १९, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा) असे मृत तरुणीचे नाव आहे. नंदिनी बेपत्ता असल्याची तक्रार यापूर्वी मुंढवा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. शनिवारी खराडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मुंढवा नदीकाठाजवळ एका तरुणीचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तसेच इतरांनी नदीपात्रातून मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर मृत तरुणीची ओळख पटवण्यात आली.

सुरुवातीला खराडी पोलिस ठाण्यात या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, नंदिनीच्या मृत्यूबाबत तिची आई जयलक्ष्मी गायकवाड यांनी संशय व्यक्त करत पोलिसांत तक्रार दिली. आईने घातपाताचा संशय व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी प्रकरणात अतिरिक्त कलमे समाविष्ट करून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

विवाहितेला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पती, सासूसह नातेवाईकांवर गुन्हा

लोणीकंद, ता. २९ : माहेरून एक लाख रुपये आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासू आणि नणंदेविरोधात लोणीकंद पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पैशांची मागणी पूर्ण न केल्याने मारहाण, शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप विवाहितेने तक्रारीत केला आहे.

याप्रकरणी पती नवीन उल्हास नागपुरे, सासू नुतन उल्हास नागपुरे आणि नणंद सोनाली सॅम्युअल यांच्याविरोधात तक्रार देण्यात आली आहे. तक्रारदार विवाहिता सध्या वाडेबोल्हाई येथे माहेरी राहत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जानेवारी २०२३ रोजी दोन्ही कुटुंबांच्या संमतीने विवाह नोंदणी पद्धतीने लग्न झाले. लग्नानंतर सुरुवातीचे दोन ते तीन महिने सासरच्या मंडळींचे वागणे चांगले होते. लग्न ठरण्यापूर्वी नोकरी करण्यास परवानगी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र लग्नानंतर पतीने नोकरी करण्यास नकार दिला. कपड्यांवरूनही सासू टोमणे मारत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. माहेरून एक लाख रुपये आणण्याची मागणी पतीने केली होती. विवाहितेने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर पती आणि सासूने शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याचा आरोप आहे.

२६ मे २०२३ रोजी माहेरच्या आई-वडिलांशी संबंध ठेवण्यावरून वाद झाला असता पुन्हा मारहाण करण्यात आली. पोलिसांत तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर पतीने आत्महत्येची धमकी दिल्याने आपण तक्रार न करताच घरी परतल्याचेही विवाहितेने नमूद केले आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये विवाहितेला मुलगी झाली. मात्र, पती आणि सासूला मुलगा हवा असल्याने मुलगी झाल्यानंतर ते नाराज होते, असा आरोप तिने केला आहे. मुलगी आजारी पडल्यावर उपचारांसाठी तसेच तिच्या संगोपनासाठी लागणारा खर्च माहेरून आणण्यास सांगितले जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, पतीला परदेशात जायचे असल्याने त्यासाठीही माहेरून एक लाख रुपये आणण्याची मागणी केली जात होती. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर पतीकडून शिवीगाळ व मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप विवाहितेने केला आहे. तसेच घरकाम आणि स्वयंपाकावरून नणंद व सासू टोमणे मारून अपमानित करत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. मार्च २०२३ ते जून २०२६ या कालावधीत पती, सासू आणि नणंद यांनी संगनमताने पैशांची मागणी करून शारीरिक व मानसिक छळ केल्याचे विवाहितेने तक्रारीत म्हटले आहे.

पुण्यात पत्नीनेच पतीच्या हत्येसाठी दिली १५ लाख रुपयांची सुपारी

पुणे, ता. २९ : मालमत्तेच्या वादातून पती आणि त्याच्या मैत्रिणीची हत्या घडवून आणण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप पुण्यातील एका प्रकरणातून समोर आला आहे. या प्रकरणात पत्नीने १५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचा दावा करण्यात आला असून, त्यापैकी १२ लाख ५० हजार रुपये संबंधित तरुणाला दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी आंबेगाव पोलिसांनी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



तक्रारीनुसार, ४९ वर्षीय फिर्यादीने कुटुंबाचा विरोध असतानाही २००६ मध्ये प्रेमविवाह केला होता. या दाम्पत्याला एक मुलगा आहे. कालांतराने मालमत्तेच्या मुद्द्यावरून पती-पत्नीमध्ये मतभेद निर्माण झाले. २०२३ मध्ये पतीचा महाविद्यालयीन काळातील मैत्रिणीशी पुन्हा संपर्क झाल्यानंतर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाल्याचे सांगितले जाते. घरातील वादानंतर पती पत्नीपासून वेगळा राहण्यासाठी आपल्या आईकडे गेला होता. त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी पत्नीने खासगी गुप्तहेर नेमल्याचाही आरोप आहे.

या घटनेबाबत २० सप्टेंबर २०२६ रोजी फिर्यादीला माहिती मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यांच्या भाच्याने भेट घेऊन कथित हत्येच्या कटाविषयी सांगितले. त्याच्या दाव्यानुसार, पत्नी, तिची आई आणि मामा यांनी पती व त्याच्या मैत्रिणीला ठार मारण्यासाठी त्याच्याशी चर्चा केली होती.

मार्च २०२६ पासून वेगवेगळ्या टप्प्यांत १२ लाख ५० हजार रुपये मिळाल्याचे संबंधित तरुणाने सांगितल्याचा दावा आहे. यापूर्वीही काही जणांकडे हे काम सोपवण्याचा प्रयत्न झाला होता; मात्र तो यशस्वी झाला नसल्याचे त्याने सांगितले. या कथित कटाशी संबंधित मोबाईलवरील संभाषणाचे रेकॉर्डिंगही त्याने फिर्यादीला ऐकवले. त्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. आंबेगाव पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल केला असून, सहायक पोलीस निरीक्षक स्वाती देवधर पुढील तपास करत आहेत. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे.

१ नोव्हेंबरपासून मोफत धान्य बंद होणार? व्हायरल मेसेज मागचं सत्य काय?

पुणे, ता. २९ : सोशल मीडियावर सध्या एक मेसेज वेगाने व्हायरल होत आहे, ज्यामध्ये असा दावा केला जात आहे की, येत्या १ नोव्हेंबर २०२६ पासून महाराष्ट्रातील सर्व पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारकांना मोफत धान्य मिळणे बंद होणार आहे.या मेसेजमुळे अनेक शिधापत्रिकाधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतु, हा दावा पूर्णपणे दिशाभूल करणारा असून राज्य सरकारने सर्व रेशनकार्डधारकांचे धान्य बंद करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही.

केंद्र सरकारच्या 'मिशन सुधार' उपक्रमांतर्गत सध्या महाराष्ट्रभरात रेशनकार्डांची पडताळणी मोहीम सुरू आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश सरकारी योजनांचा लाभ योग्य आणि खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवणे हा आहे. या प्रक्रियेत खालील प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी केली जात आहे:

मृत व्यक्तींच्या नावावर असलेले रेशनकार्ड,बनावट किंवा दुबार (duplicate) नोंदी, कायमचे स्थलांतरित झालेले नागरिक,गेल्या अनेक महिन्यांपासून वापरात नसलेली रेशनकार्ड, फक्त अपात्र कार्डधारकांवर कारवाई या सर्वांची तपासणी केली जात आहे

या पडताळणीदरम्यान नियमांत न बसणाऱ्या आणि अपात्र ठरलेल्या सुमारे २.८५ लाख लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. यामुळे केवळ अपात्र ठरलेल्यांचाच अन्नधान्याचा पुरवठा थांबणार आहे. सर्वसामान्य, पात्र आणि गरजू पिवळ्या तसेच केशरी रेशनकार्डधारकांना आधी प्रमाणेच नियमानुसार मोफत धान्य मिळत राहील.

त्यामुळे नागरिकांनी सोशल मीडियावरील कोणत्याही अफवांना किंवा चुकीच्या मेसेजला बळी पडू नये. रेशनकार्डाशी संबंधित कोणतीही शंका असल्यास आपल्या जवळच्या शिधावाटप दुकानात (रेशन दुकान) किंवा तहसील कार्यालयात जाऊन थेट चौकशी करावी आणि अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा.

लोहगाव विमानतळ रस्त्यांचे रुंदीकरण व अतिक्रमणांवर कारवाई!

पुणे, ता. २९ : पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवास अधिक सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. या रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्यासह रुंदीकरणाची प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. मंगळवारी आयुक्तांनी विमानतळाकडे जाणाऱ्या विविध रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

विमाननगर परिसरातील व्हीव्हीआयपी रोड, सिम्बायोसिस रस्ता आणि शुभ चौक परिसरातील हातगाड्या, फेरीवाले तसेच साइड

मार्जिनमध्ये झालेल्या अतिक्रमणांची आयुक्तांनी पाहणी केली. या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी ठरावीक ठिकाणे निश्चित करून नियमितपणे अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले.

या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर आणि ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त तुषार बाबर, पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नागपूर चाळ, जेल रोड पोलीस चौकी ते ५०९ चौक आणि विकफिल्ड चौक मार्गे पुणे विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. या मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच ५०९ चौकातून हवाई दलाच्या हद्दीतून धानोरी मुख्य रस्त्याकडे जाणाऱ्या मार्गाबाबतही चर्चा करण्यात आली. या कामाला गती देण्यासाठी एअर फोर्स स्टेशन, लोहगाव येथील अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

पुण्यात शिक्षण, रोजगार आणि पर्यटनासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने नागरिक येतात. त्यामुळे विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत ठेवणे महत्त्वाचे आहे. या मार्गांवर होणारी वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणे कमी करून रस्त्यांचे रुंदीकरण व सुशोभीकरण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या कामांमुळे विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. आता अतिक्रमण हटविण्याची कारवाई आणि रुंदीकरणाची प्रलंबित कामे किती वेगाने पूर्ण होतात, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.